Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

४२/२०२६

**विषय :** e-KYC अद्ययावत करण्याच्या नावाखाली होणाऱ्या सायबर/आर्थिक फसवणुकीपासून दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन सत्रास उपस्थित राहणेबाबत.

विद्यापीठातील सर्व अधिविभाग, अध्यासने, केंद्र, प्रशाळा व प्रशासकीय विभाग यांना कळविण्यात येते की, अलीकडे e-KYC झालेली नाही, असे सांगून विद्यापीठातील काही व्यक्तींना अनोळखी व्यक्तींकडून फोन, SMS अथवा WhatsApp द्वारे संपर्क करून फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा फसवणुकीमध्ये काही व्यक्तीच्यां बँक खात्यातील रक्कम अनधिकृतरीत्या काढून घेतल्याच्या घटना देखील अलीकडच्या काळात घडल्या आहेत.

सदर बाबीची दखल घेऊन e-KYC तसेच बँकिंग व्यवहारांमध्ये होणारी फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता याबाबत UCO Bank मार्फत आपणास मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व इतरांनी **मंगळवार, दि. ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षि शाहू सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत येथे उपस्थित राहावे.**

**विशेषत:**, OTP, PIN, CVV, पासवर्ड अथवा बँक खात्याची गोपनीय माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीस देऊ नये, याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा. क्र. आस्थापना / 2013

दि. 07 SEP 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय

२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक

३) **अभियांत्रिकी स्थापत्य व विद्युत विभाग** यांनी सभागृहातील स्वच्छता, विद्युत व माईक/सांऊड व्यवस्था करावी.

३) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक व इतर यांचे निदर्शनास आणावे.**